# प्रकरण - एक

## प्रास्ताविक

१.१ विषय प्रवेश

१.२ समस्येचे शब्दांकन

१.३ संशोधनविषयाचे महत्व

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाची गृहितके

१.६ संशोधनाच्या मर्यादा

१.७ संशोधन पध्दती

१.८ प्रकरणीकरण

## १.१ विषय प्रवेश :

इ.स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. २६ नोव्हेंबर, १९४९ या दिवशी भारतीय जनतेने भारतीय संविधानाचा स्वीकार केला. या संविधानानुसार सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, वैचारिक आणि आविष्काराचे स्वातंत्र्य आणि समान संधीची ग्वाही देण्यात आली त्यामुळे स्त्री व पुरुष यांना समान अधिकार प्राप्त झाले. परंतु श संशोधिकेच्या मते प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी आहे. दैनंदिन वर्तमानपत्र उघडताच स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची, बलात्काराची एखादी तरी बातमी दृष्टीस पडतेच. हुंडाबळीची समस्या भीषण रुप धारण करीत असल्याचे दिसून येते. याचवेळी असा विचार येतो की या स्त्रीला शिक्षण मिळाले असते तर कदाचित ती स्वावलंबी झाली असती, तिचा आत्मविश्वास वाढला असता व बळी जाण्याची दुर्घटना टळली असती.

आजच्या या विज्ञानयुगातही हजारो माणसांच्या उपस्थितीत रुपकुँवर सती जाते. याचा अर्थ रुढी, परंपरा यांचा स्त्रीमनावर आजही पगडा दिसतो. जर स्त्रिया शिक्षित झाल्या असत्या तर हा पगडा कमी झाला असता.

चार सधन स्त्रियांनी हौसेखातर महिलामंडळे चालविली व समाजकार्याचे काही उपक्रम आखले तर त्याचा अर्थ सर्वच स्त्रियांना स्वातंत्र्य आहे व त्या सुशिक्षित आहेत असा होऊ नये. बहुसंख्य स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार करता स्त्रीशिक्षणातील समस्यांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून दर्जा आहे, तो तिचा मूलभूत हक्क आहे, तो तिला शिक्षणामुळेच मिळेल. म्हणूनच स्त्रियांच्या शिक्षणविषयक समस्यांचा विचार झाला पाहिजे असे आवर्जून नमूद करावे लागते.

आज जागतिक नागरिकत्वाची संकल्पना रूढ होऊ पहात आहे. स्थायी स्वरूपाची शांतता निर्माण करण्याच्या हेतूने सध्या जगामध्ये निकराचा प्रयत्न चालू आहे. तथापि हे उद्दिष्ट सफल होण्यास जर कोणती प्रमुख अडचण येत असेल तर ती म्हणजे पुरूष जातीकडून व्यक्त होणारी जुनाट स्वरूपाची पारंपारिक मनोवृत्ती. भावी काळातील विश्वसमाजाची उभारणी करताना आंतरराष्ट्रीय संबंध सहकार्याचे हवेत. यासाठी पुरूष जातीने उभी केलेली मुक्काम्यातील व्यवहाराची चौकट निषेधार्ह मानली पाहिजे. हृदयाची विशालता, सहिष्णुता, समजूतदारपणा, सहजीवन व औदार्य यांची दाणोदाणी गरज भासणार आहे. जेंव्हा जगातील स्त्रिया संकुचित राष्ट्रवादने प्रेरित न होता जागतिक बंधुभावनेने कार्य करण्यास प्रवृत्त होतील तेंव्हा या जगाचा चेहरामोहराच बदलून जाईल. सबब नव्या शैक्षणिक धोरणात स्त्रीशिक्षणातील समस्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

## १.२ समस्येचे शब्दांकन :

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालीलप्रमाणे केले आहे :

"कोल्हापूर शहरातील महाविद्यालयातील व पदव्युत्तर विभागातील मुलींच्या शिक्षण- विषयक समस्यांचा चिकित्सक अभ्यास."

संशोधन हे एक शास्त्रीय कार्य असल्याने विविध संज्ञांचा वापर करताना ती एकाच आणि त्याच अर्थाने सातत्याने करणे अगत्याचे आहे. त्यासाठी संशोधनात वापरलेल्या संज्ञांच्या व्याख्या करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत समस्येच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

१) कोल्हापूर शहर -

कोल्हापूर शहर म्हणजे कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत असणारा प्रदेश. कोल्हापूर शहराच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे :

पूर्व - शाहू नाका
पश्चिम - फुलेवाडी
दक्षिण - कंदलगाव किंवा वाशी नाका
उत्तर - शिवाजी पूल

२) महाविद्यालय -

उच्च माध्यमिक शिक्षणानंतरचे परंतु कला, वाणिज्य व शास्त्र या शाखांतील पदवीपर्यन्तचे शिक्षण देणारी शासनमान्य शिक्षण संस्था.

कोल्हापूर शहरात एकूण दहा महाविद्यालये आहेत. ती खालीलप्रमाणे :

१. राजाराम महाविद्यालय, विद्यानगर, कोल्हापूर
२. गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, सुभाष पथ, कोल्हापूर
३. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, बिंदू चौक, कोल्हापूर
४. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, शुक्रवार पेठ, कोल्हापूर
५. कमला महाविद्यालय, राजारामपुरी, कोल्हापूर
६. महावीर महाविद्यालय, नागाळा पार्क, कोल्हापूर
७. श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर

८. शाहू महाविद्यालय, कदमवाडी, कोल्हापूर
९. विवेकानंद महाविद्यालय, जुना बुधवार, कोल्हापूर
१०. न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

(कोल्हापूर महानगरपालिकेचे क्षेत्र आणि त्या क्षेत्रात येणारी महाविद्यालये यांचा नकाशा पुढील पानावर दिलेला आहे.)

यापैकी पहिल्या तीन महाविद्यालयांना दीर्घ परंपरा आहेत. राजाराम महाविद्यालय हे शासकीय आहे. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हे कोल्हापूर महानगरपालिकेच्या अखत्यारीत आहे.

१) राजाराम महाविद्यालय

२) गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज

३) राजर्षी छ. शाहू कॉलेज

४) विवेकानंद कॉलेज

५) न्यू कॉलेज

६) श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय


७) देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार वाणिज्य महाविद्यालय

८) महावीर महाविद्यालय

९) यशवंतराव चव्हाण कॉलेज

१०) कमला कॉलेज

११) पदव्युत्तर विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



३) पदव्युत्तर विभाग -

पदव्युत्तर विभागामध्ये एम्.ए., एम्.कॉम्., एम्.एस्सी. या प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष यामधील विद्यार्थिनींचा विचार केला आहे.

कोल्हापूर शहरात कला, वाणिज्य व शास्त्र या शाखांतील पदव्युत्तर शिक्षण देण्याची व्यवस्था शिवाजी विद्यापीठ, राजाराम महाविद्यालय, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार वाणिज्य महाविद्यालय, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय तसेच छ. शाहू सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन ॲन्ड रिसर्च येथे आहे.

४) शिक्षणविषयक समस्या -

शिक्षणविषयक समस्या ही संज्ञा शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी अशा अर्थी वापरली आहे. या अडचणी अध्ययनविषयक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, स्थलकालविषयक अशा विविध प्रकारच्या आहेत.

५) चिकित्सक -

या समस्यांचा चिकित्सक अभ्यास म्हणजे सविस्तर, तपशीलवार, सांगोपांग, सूक्ष्म अभ्यास होय. मुलींना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणींची कारणमीमांसा करून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी केलेला अभ्यास.

१.३ संशोधन विषयाचे महत्व :

स्त्रीशिक्षणाचा विचार घरापुरताच केला तर आदर्श माता, पत्नी, गृहिणी इथपर्यन्त सीमित न ठरतो. पण औद्योगिक क्रांतीनंतर या विचारात बदल झाला. स्त्री सुशिक्षित असणे महत्वाचे ठरले. कारण

व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकत्वाच्या योग्य जाणिवेसाठी, फुरसदीच्या वेळेच्या सदुपयोगासाठी, समाधानी जीवन जगण्यासाठी, व्यवसायासाठी शिक्षण देणे महत्वाचे ठरले.

स्त्रिया या भविष्याच्या ख-या शिल्पकार आहेत असे म्हणण्यास हरकत नसावी. कारण त्यांच्यामार्फत आदर्श जीवनमूल्यांची जोपासना होऊन आदर्श राष्ट्रनिर्मितीचे कार्य घडू शकते.

स्त्रिया स्वावलंबी होण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी स्त्रीशिक्षण महत्वाचे आहे. तसेच त्यांना स्वतः:चे हक्क व कर्तव्ये यांची जाणीव होण्यासाठी शिक्षणाची गरज आहे.

संस्कृतीचा विकास साधण्यासाठी सुसंस्कारित बालक घडविण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाचा संस्कार मिळणे निकडीचे आहे.

प्राचीन कालीन स्त्रीची भूमिका व २० व्या शतकातील स्त्रीची भूमिका ही निश्चितपणे वेगळी आहे. २० व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना देशातील प्रत्येक स्त्री सुविद्य कशी बनेल याचा विचार केला पाहिजे. अशावेळी अडचणी येतात. त्यांचा ऊहापोह करणे आवश्यक ठरते. आणि प्रस्तुत प्रबंधात नेमक्या ह्याच गोष्टीवर लक्ष केंद्रित केले आहे.

मुलींच्या शिक्षणाच्या समस्या या विविध व व्यापक आहेत. पालकांचा दृष्टिकोन, रूढी, परंपरा, सामाजिक सुरक्षितता, पालकांची आर्थिक स्थिती व शिक्षणाच्या सुविधा, माध्यम इत्यादी संदर्भात आहेत. त्याची कारणमीमांसा करून सुचविलेली उपाययोजना विद्यार्थिनी, शिक्षक, पालक, संस्थाचालक, शासन यांना उपयुक्त होईल.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची पुढील तीन उद्दिष्टे आहेत.

१) कोल्हापूर शहरातील महाविद्यालयीन व पदव्युत्तर विभागातील मुलींच्या शिक्षणविषयक समस्यांचा शोध घेणे.

२) त्यांच्या शैक्षणिक समस्यांची कारणमीमांसा करणे आणि

३) या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

१.५ संशोधनाची गृहितके :

१) स्त्री हा समाजाचा एक प्रमुख घटक आहे. सबब समाजाचा विकास होण्यासाठी स्त्रियांचा विकास होणे आवश्यक आहे आणि शिक्षणाद्वारेच स्त्रियांचा विकास होईल.

२) यासाठी स्त्रियांना शिक्षण घेताना कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना करणे हे कोणत्याही प्रगत आणि सुसंस्कृत राष्ट्राचे महत्वाचे कर्तव्य ठरते.

३) भारतीय घटनेनुसार स्त्री-पुरुष समानता स्वीकारली आहे. त्याची प्रत्यक्ष कार्यवाही व्हावयाची असल्यास आतापर्यंत शैक्षणिकदृष्ट्या वंचित असलेल्या स्त्रियांना अधिकाधिक शैक्षणिक संधी देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्या अडचणींचे निराकरण करणे अपरिहार्य ठरते.

१.६ <u>संशोधनाच्या मर्यादा</u> :

१) हे संशोधन फक्त मुलींच्या शिक्षणविषयक समस्यांचाच विचार करण्यापुरते मर्यादित आहे.

२) हे संशोधन फक्त कोल्हापूर शहरापुरतेच मर्यादित आहे. सबब या संशोधनात कोल्हापूर शहरातील उपरिनिर्दिष्ट फक्त दहा महाविद्यालयांचा विचार केला आहे.

३) पदव्युत्तर विभागातील फक्त एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. या पदव्यांसाठी अभ्यास करणाऱ्या मुलींच्याच शैक्षणिक समस्यांचा विचार केला आहे.

१.७ <u>संशोधन पध्दती</u> :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. या समस्येच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयुक्त ठरणार आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामग्रीचे वर्णन, संकलन, स्पष्टीकरण व मूल्यांकन केले असून चांगल्या बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनाची सामग्री गोळा करण्यासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला.

१) <u>प्रश्नावली</u> -

महाविद्यालयीन व पदव्युत्तर विभागातील मुलींना शिक्षणविषयक ज्या विविध प्रकारच्या अडचणी येतात त्या जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. ही प्रश्नावली मुख्यत: व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक

व सामाजिक समस समस्यांवर आधारित अशी होती. प्रश्नावलीत बंदिस्त, मुक्त व संमिश्र असे तिन्ही स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आले होते. प्रश्नावलीत एकूण १०१ प्रश्न होते. प्रश्नावलीतील प्रश्नांचे उद्देश स्पष्ट करणारी सारणी पुढे दिली आहे.

सारणी क्रमांक १.१

प्रश्नावलीतील प्रश्नांचा उद्देश

| अ.नं. | प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|
| १. | १ ते ५ | प्रतिसादकांची सर्वसाधारण माहिती मिळविणे. |
| २. | ६ ते २५ | प्रतिसादकाची कौटुंबिक माहिती जाणून घेणे |
| ३. | २६ ते ५८ | प्रतिसादकाचा शिक्षण घेण्याविषयीचा व्यक्तिगत दृष्टिकोन समजून घेणे. |
| ४. | ५९ ते ६८ | प्रतिसादकाच्या सामाजिक समस्या जाणून घेणे |
| ५. | ६९ ते ८१ | प्रतिसादकाच्या आर्थिक अडचणी समजून घेणे. |
| ६. | ८२ ते १०१ | प्रतिसादकाच्या शैक्षणिक समस्या जाणून घेणे. |
| | अ) ८१ ते ८५ | प्रतिसादकाच्या अभ्यासक्रमविषयक समस्या जाणून घेणे. |
| | ब) ८६ ते ८९ | प्रतिसादकाच्या पाठयपुस्तकविषयक समस्या जाणून घेणे. |
| | क) ९० ते ९४ | प्रतिसादकाच्या अध्यापनविषयक समस्या जाणून घेणे. |
| | ड) ९५ ते १०० | पुरूष विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणायेणाऱ्यात अडचणी समजून घेणे. |
| ७. | १०१ | प्रश्नावलीत न विचारलेली पण संशोधनास उपयुक्त अशी माहिती जाणून घेणे. |

सदर प्रश्नावलीद्वारे माहिती घेण्यासाठी उपरिनिर्दिष्ट महाविद्यालयांच्या प्राचार्यांची व पदव्युत्तर विभागातील विभागप्रमुखांची भेट घेतली. व सहकार्य करण्यासाठी विनंती करून विद्यार्थिनींकडून प्रश्नावली भरून घेण्यासाठी दिवस निश्चित केला. निश्चित केलेल्या दिवशी त्या महाविद्यालयांना भेटी देऊन त्या दिवशी उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थिनींना संशोधन विषयाचे महत्व आणि त्यांनी संशोधन प्रश्नावली भरून देण्याची गरज यासंबंधीचे विवेचन करून प्रश्नावली भरू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना प्रश्नावल्या देण्यात आल्या. (प्रश्नावली परिशिष्ट `अ` मध्ये देण्यात आली आहे.) अशाप्रकारे महाविद्यालयीन स्तरावरील २८७ विद्यार्थीनींना व पदव्युत्तर स्तरावरील ५८ विद्यार्थिनींना प्रश्नावल्या देण्यात आल्या. अपुऱ्या भरलेल्या तसेच चुकीच्या असलेल्या प्रश्नावल्या बाजूला करून महाविद्यालयीन स्तरावरील २०० प्रश्नावल्या व पदव्युत्तर स्तरावरील ५० प्रश्नावल्या विश्लेषणासाठी घेतल्या. (प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या विद्यार्थिनींची नावे परिशिष्ट `ब` आणि परिशिष्ट `क` मध्ये देण्यात आली आहेत.

कोल्हापूर शहरातील उपरिनिर्दिष्ट पमहाविद्यालयातील एकूण विद्यार्थिनींची संख्या पुढील सारणी क्र. १.२ (कोल्हापूर शहरातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या (१९८७-८८) व सारणी क्रमांक १.३ (कोल्हापूरात शहरात पदव्युत्तर विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या (१९८७-८८) मध्ये दिली आहे.